२५१५

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : डब्ल्युएलपी ०८१४/प्र.क्र.१८६/फ-१
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०२.०९.२०१४

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

विषय :- शेतीपिकास धोकादायक ठरलेल्या रानडुकरांचा बंदोबस्त करण्यासाठी मार्गदर्शक सुचनाबाबत.

संदर्भ :-१.आपलेकडील पत्र क्रमांक २३(४)/१८०४/२०१४-१५, दिनांक १९.०८.२०१४
२. आपलेकडील पत्र क्रमांक २३(४)/९८(२०१४)/१९४८, दिनांक २८.०८.२०१४

वन्यप्राण्यांपासून होणाऱ्या नुकसान भरपाईच्या प्रकरणांवर निर्णय घेण्याकरीता आपल्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीने सादर केलेला अहवाल महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक २०.०२.२०१४ रोजीच्या आठव्या बैठकीत स्विकृत केला आहे. अहवालातील शिफारशीवर पुढील कार्यवाही करण्यास्तव संबंधिताना शासनाकडून निर्देश जारी करावेत असे मंडळाचे अध्यक्ष तथा मा. मुख्यमंत्री यांनी सुचित केले होते. सदर निर्देशानुसार जारी करावयाच्या मार्गदर्शक सूचना सोबत सहपत्रित करण्यात येत आहेत. या सूचनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना अवगत करण्यात यावे व आवश्यक ती कार्यवाही करावी, ही विनंती.

(डॉ.यु.एम.फारुकी)
सह सचिव (वने),
महसूल व वन विभाग

सहपत्र : वरीलप्रमाणे

D
2/9/14
Sangmai

CR-१८६-२०१४

# निलगाय व रानडुक्करांची पारध करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना

वन्यप्राण्यांपासून होणाऱ्या नुकसान भरपाईच्या प्रकरणांवर निर्णय घेण्याकरीता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीचे गठण करण्यात आले होते. सदर समितीने सादर केलेला अहवाल महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक २०.०२.२०१४ रोजीच्या आठव्या बैठकीत मांडण्यात आला होता. सदर अहवाल स्विकृत करण्यात येऊन अहवालातील शिफारशीवर पुढील कार्यवाही करण्यास्तव संबंधिताना शासनाकडून निर्देश जारी करावेत असे मंडळाचे अध्यक्ष तथा मा. मुख्यमंत्री यांनी सूचित केले होते. सदर निर्देशानुसार खालीप्रमाणे मार्गदर्शक सुचना जारी करण्यात येत आहेत.

उपरोक्त समितीने वनांची सद्यस्थिती व भौगोलिक स्थानांच्या आधारे खालीलप्रमाणे ५ प्रभाग निर्मित करण्यात आले आहेत.

| | |
|---|---|
| प्रभाग I | संरक्षित क्षेत्रे यामध्ये राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, व्याघ्र प्रकल्प, संवर्धन राखीव क्षेत्र इत्यादींचा समावेश राहील. |
| प्रभाग II | इतर वन्यजीव संवेदनशील क्षेत्र यामध्ये पर्यावरण संवेदनशील क्षेत्र व निवड केलेले धोकाग्रस्त वन्यजीव भ्रमंतीमार्ग. |
| प्रभाग III | मनुष्य वस्तीलगत असलेली महत्वाची वन्यजीव आश्रयस्थाने. |
| प्रभाग IV | अल्प वनक्षेत्र असलेले भाग वा वनक्षेत्र नसलेले वन्यप्राण्यांद्वारे शेत पिक नुकसानीस प्रवण भाग. |
| प्रभाग V | वन / वन्यप्राणी अस्तित्व नसलेले परंतु पिक नुकसानीस प्रवण क्षेत्र. |

वरीलपैकी प्रभाग ३ ते ५ मध्ये वनक्षेत्र कमी आहे किंवा वनक्षेत्र नाही, अशा क्षेत्रात तृणभक्षी प्राण्यांवर उपजीविका करणाऱ्या भक्षक मांसाहारी प्राण्यांची संख्या फारच कमी आहे किंवा जवळपास नाहीत. त्यामुळे तृणभक्षी प्राण्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी नैसर्गिक मार्ग नसल्याने त्यांची संख्या बेसुमार वाढून शेतपीक नुकसान मोठ्या प्रमाणावर होत आहे. ह्या तीन प्रभागासांठी मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे आदेश कक्ष-२३(४)/प्र.क्र.४९४/१६०३ दि.२१/०७/२०१३ अन्वये निलगाय व रानडुक्करांची पारध करण्याची परवानगी देण्याबाबत सहायक वन्यजीव रक्षक तथा वनक्षेत्रपाल (प्रादेशिक) यांना प्रदान केले आहेत, सदर अधिकार ह्या पुढेही कायम राहतील.

त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे राहतील.

१. रानडुक्कर किंवा रोही या वन्यप्राण्यांपासून शेतपिकांचे नुकसान होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी संबंधीत वनक्षेत्रपाल यांचेकडे अर्ज देऊन करावी.
२. उपरोक्त तक्रार प्राप्त झाल्यावर संबंधीत वनक्षेत्रपाल यांनी तक्रारीची लगेचच पोच पावती द्यावी. तक्रारीची शहानिशा करुन रानडुक्कर किंवा रोहीची पारध करण्याबाबत परवाना निर्गमित करावा. सदर परवाना तक्रार प्राप्त झाल्याच्या २४ तासाच्या आत निर्गमित होतील याबाबतची दक्षता त्यांनी घ्यावी. जर २४ तासाच्या आत परवाना दिला नाही किंवा नाकारला नाही तर अर्जदारांनी परवाना देण्यात आलेला आहे, असे गृहीत धरुन पारध करण्याची मुभा राहील.

३. पारध करण्याच्या परवान्यात परवाना धारकाचे नांव आणि पारध करण्यासाठी लागणारा व्यवहारिक कालावधी याबाबतची माहिती नमूद करावी.

४. पारध करण्याची परवानगी दिलेल्या परवानाधारकाने पारध केलेल्या प्राण्याचे दोन फोटोसह (जिथे शक्य असेल तिथे डिजीटल फोटो पाठवावा, जेणेकरुन प्रिंटींगचा भुर्दंड पडणार नाही) अहवाल वनक्षेत्राल यांच्याकडे पाठवावा.

५. प्रत्येक महिन्यात देण्यात आलेले परवाने व त्यानुसार पारध करण्यात आलेल्या रोही आणि रानडुक्कर यांच्या संख्येबाबतचा मासिक अहवाल वनक्षेत्रपाल यांनी संबंधित उपवनसंरक्षकाकडे सादर करावा. उपवनसंरक्षक व त्यांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याच स्तरावर पारध झालेल्या वन्यप्राण्यांबाबत दर महिन्यास आढावा घ्यावा.

प्रभाग I मध्ये सदर क्षेत्रात राष्ट्रीय उद्याने, अभयारण्य, व्याघ्र प्रकल्प, संवर्धन राखीव क्षेत्र इत्यादीचा समावेश असल्याने कुठल्याही परिस्थितीत पारध करण्याची परवानगी देता येणार नाही. प्रभाग II करीता मुख्य वन्यजीव रक्षक यांचेद्वारे दिनांक १४/०७/२००४ अन्वये जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.